जा.क्र.उमाशि-१/११वी प्रवेश/पुवि/२०१४-१५/98८26/30
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दि. 25 JUN 2014

प्रति,

**प्राचार्य**
**आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे**
**मराठवाडा मित्र मंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, पुणे**
**पुना कॉलेज, पुणे**
**एल.आर.आपटे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे**

**विषय :- <u>इयत्ता ११ वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश प्रक्रिया सन २०१४-१५</u>.**

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने निश्चित केले जात आहेत. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण झालेला आहे. केंद्रिय प्रवेश समितीकडे एकुण ६०८२५ प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेले आहेत.

एकुण प्राप्त झालेल्या ऑनलाईन प्रवेश अर्जावर संगणकीय एजन्सी (एमकेसीएल) मार्फत विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्याचे कामकाज पूर्ण होत आहे. संगणकीय एजन्सीने प्रवेश निश्चितीचे कामकाज शासकीय सर्व नियमानुसार सामाजिक व विशेष आरक्षणाचे तंतोतंत पालन, कनिष्ठ महाविद्यालयनिहाय प्रवेश क्षमता व त्यानुसार प्रत्यक्ष झालेले प्रवेश व गुणवत्तेनुसार झालेले प्रवेश या व अन्य बाबींची सरमिसळ पध्दतीने तपासणी करावयाची आहे. सदर तपासणी **दि.२६.०४.२०१४** रोजी **सकाळी १०:३०** वाजता **एमकेसीएल कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे** येथे करण्यात येणार आहे. तरी तपासणीसाठी खालील उच्च माध्यमिक शिक्षकांची समिती स्थापन केलेली आहे. सदर शिक्षकांना या कामासाठी वरील ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचित करावे.

१. श्री गाजरे एल. व्ही., एल.आर.आपटे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे
२. श्रीमती गायकवाड ज्योती, मराठवाडा मित्र मंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, पुणे
३. श्री सुधिर भोसले, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे
४. श्रीमती कौल एस. एस., आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे
५. श्री अजीज शेख, पुना कॉलेज, पुणे

25/6/14

**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१ तथा**
**अध्यक्ष**
**इ.११वी केंद्रिय प्रवेश समिती, पुणे**

शिक्षण उपसंचालक, पुणे
पुणे - १ यांचे कार्यालय
25 JUN 2014
98८26/30
जावक नोंदवही क्रमांक

25/6